शिक्षण प्रसारक संस्थेचे,

# श्री. ओंकारनाथ मालपाणी विधी महाविद्यालय, संगमनेर

# महत्वाची सूचना

**दि. 10/01/2022**

सर्व विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की, भारत निवडणूक आयोग यांच्या निर्देशानुसार **दि. 25 जानेवारी, 2022 रोजी राष्ट्रीय मतदार दिवस साजरा** करण्यात येणार आहे. त्यानुसार आपल्या महाविद्यालयात खालील विषयावर **दि. 18 जानेवारी, 2022 रोजी सकाळी 11.00 वा. ऑनलाईन वक्तृत्व स्पर्धेचे** आयोजन करण्यात आले आहे.

- **स्पर्धेचे विषय**

1) आपल्या देशात लोकशाही रुजली आहे का?
2) .....म्हणून मी मताधिकार बजावतो /बजावते!
3) लोकशाही आणि तरुण मतदार
4) व्यवस्था बदलाचा राजमार्ग : मताधिकार
5) मताधिकाराची सक्ती करावी का?
6) तृतीय पंथीयांच्या मताधिकाराचे महत्व आणि आवाहन

- **स्पर्धेचे नियम :-**

1) स्पर्धकाने निवडलेल्या विषयावर 8 मिनिटे बोलावे.
2) वक्तृत्व स्पर्धा मराठी भाषेत होईल.
3) परीक्षकांचा निर्णय अंतिम राहील.
4) स्पर्धकाच्या भाषणात /अभिव्यक्तीमध्ये कोणत्याही प्रकारचा अपशब्द, तिरस्कार, सांप्रदायिक, जातीय, बदनामीकारक, लैंगिक, प्रक्षोभक, अवमानकारक, राजद्रोह संकल्पना विचार किंवा भाष नसेल, तसेच त्यात बेकायदेशीर, अवैध, अनैतिक आणि सार्वजनिक धोरणाच्या विरोधी असा कोणतही मजकूर नसेल. याशिवाय ज्यामुळे कुणाच्याही खाजगी जीवनात हस्तक्षेप किंवा भंग होईल, असा मजकूर किंवा अन्य कुणाच्या बौध्दिक संपदेचे उल्लघंन करणारे काहीही आपल्या भाषणात नाही याची दक्षता स्पर्धकांनी घ्यावी.
5) नियोजित वेळेला व तारखेला स्पर्धक उपस्थित नसल्यास स्पर्धकांना अपात्र ठरविले जाईल.
6) प्रवेशिका दिनांक 17 जानेवारी, 2022 पर्यंत संध्या. 5.00 वा. जमा कराव्यात.
7) स्पर्धेतून 3 विजेते क्रमांक काढले जातील व त्याची घोषणा दि. 25 जानेवारी, 2022 रोजी करण्यात येईल.
8) विजेत्यांना आकर्षक पारितोषिक / बक्षीस वार्षिक स्नेहसंमेलनात दिले जाईल.

- **टीप :- अपवादात्मक परिस्थितीत स्पर्धा व निकाल यामध्ये बदल करण्याचा अधिकार आयोजक राखून ठेवत आहे.**

- **स्पर्धेबाबत संपर्क :- प्रा. सचिन पठारे - 9309730990**

Shri.Omkarnath Malpani Law College
ID NO. PU/AN/LAW/59/ 14/8/1998
Sangamner, Dist. A'Nagar

**सहा. प्रा. राहूल देशमुख**

Principal
S.P. Sanstha's
Shri.Omkarnath Malpani Law College
Sangamner (M.S.) India Pin-422 605